**CCE PF**
**CCE PR**

ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : **08-M** ವಿಷಯ : **ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ — ಮರಾಠಿ**

**Code No. : 08-M Subject : First Language — MARATHI**

**( ಹೊಸ ಪಠ್ಯಕ್ರಮ / New Syllabus )**

**( ಖಾಸಗಿ ಅಭ್ಯರ್ಥಿ + ಪುನರಾವರ್ತಿತ ಖಾಸಗಿ ಅಭ್ಯರ್ಥಿ / Private Fresh + Private Repeater )**

**सामान्य सूचना :**

i) या प्रश्नोत्तर पत्रिकेत वस्तुनिष्ठ व विवरणात्मक असे एकूण 64 प्रश्न आहेत.

ii) प्रत्येक वस्तुनिष्ठ प्रश्नांच्या उत्तरासाठी दिलेल्या जागेतच पूर्ण उत्तर, संकेताक्षरासह लिहावे.

iii) विवरणात्मक प्रश्नांच्या उत्तरासाठी पुरेशी जागा दिलेली आहे. त्याच ठिकाणी आपली उत्तरे लिहिणे आवश्यक आहे.

iv) वस्तुनिष्ठ आणि विवरणात्मक प्रश्नांसमोर दिलेल्या सूचने प्रमाणे उत्तरे लिहावे.

v) विद्यार्थांनी प्रश्नांची उत्तरे पेन्सीलने लिहू नयेत, लिहिल्यास त्या उत्तरांना गुण दिले जाणार नाहीत. ( नकाशा, आकृति, आलेख व्यतिरिक्त ).

vi) या प्रश्नोत्तर पत्रिकेत दिलेल्या बहुपर्यायी, रिकाम्या जागा भरा व जोड्या जुळवा या सारख्या प्रश्नांची उत्तरे लिहिताना खाडाखोड किंवा खाणा खुणा करु नयेत, तसे केल्यास त्या उत्तरांना गुण दिले जाणार नाहीत.

vii) विद्यार्थांना पंधरा मिनिटांचा जास्त वेळ देण्यात आला आहे. त्याचा उपयोग प्रश्नपत्रिका वाचण्यासाठी करावयाचा आहे.

viii) उजवी कडील धारा या मध्ये दिलेल्या जागेत काही लिहू नका.

## विभाग - A

## ( गद्य पद्यांशावर आधारित )

I. खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा : 16 × 1 = 16

1. नागदेवाचार्याचे पट्टशिष्य कोण ?

2. हत्तीचा दृष्टांत स्वामीनी म्हाइंभटाना कोठे सांगितला ?

3. चि० वि० जोशींच्या मानसपुत्रांची नावे काय ?

4. चि० वि० जोशींच्या कुत्र्याचे नाव काय ?

5. दानधर्माची सुरवात कोठून व्हावी ?

6. नानीला आनंद का झाला ?

7. गंगूबाईंचा जन्म केंव्हा झाला ?

8. किराणा घराण्याचे संस्थापक कोण ?

9. कवी मुकुंदराज कोणाचा जयजयकार करत आहेत ?

10. रुक्मिणीच्या वडिलांचे नाव काय ?

11. कोणत्या वाटेवर काटे टोचतात ?

12. वसईवर कोणाचा अंमल होता ?

13. जपानी स्त्रिया कोणती गोष्ट कमीपणाची मानतात ?

14. केशवमेश्रामांचा मित्र कॉलेजच्या दिवसात कोठे राहत असे ?

15. तात्यानी किती वाटण्या करण्यास सांगितल्या ?

16. पाहुणे बाबांच्या पेटीतील काय पळवितात ?

II. खालील प्रश्नांची उत्तरे **तीन-चार** वाक्यात लिहा : 13 × 2 = 26

17. 'कोप-यातील छत्री घेऊ नका.' असे दुकानदार लेखकाला का म्हणाला ?

18. केशवमेश्रामच्या मित्राच्या घरी कोणता जेवणाचा बेत होता ?

19. ''तू शीक ! आणखी राबेन मी.'' संदर्भासह स्पष्ट करा.

20. संत ज्ञानेश्वरांचा परिचय द्या.

21. ''जातील कधी हे आई ? घरदार न याना कांही ?'' संदर्भासह स्पष्ट करा.

22. कोणती सवय त्या बायांना आहे ?

23. डोळस माणूस आंधळ्या माणसांना काय म्हणाला ?

24. लेखाकाच्या घरी काकूचे आगमन कसे झाले ?

25. गंगूबाईना कोणत्या उपाध्या व पदव्या मिळाल्या ?

26. श्रीकृष्णाच्या प्राप्तीसाठी रुक्मिणीने काय काय केले ?

27. परार्थीचा आप्तविस्तार कसा असतो ?

28. पृथ्वी, मला धुळीचे भूषण असे का म्हणते ?

29. माहेराला गोकुळ का म्हटले आहे ?

III. खालील प्रश्नांची उत्तरे **पाच-सहा** वाक्यात लिहा : 10 × 3 = 30

30. माणकर, आजुरकर व मोरे सरदारांनी काय केले ?

31. शील या गुणाबद्दल आंबेडकर काय म्हणतात ?

32. 'हाऊस वाईव्हज' या संस्थेची माहिती द्या.

33. शेवटी गणातात्यांनी कोणता निर्णय घेतला ? कां ?

34. 'ही बार बार तलवार येईल कां पुन्हा' म्हणजे काय ?

35. समाजसेवक कोणते काम करतात ?

36. पृथ्वीचे प्रेम मिळावे म्हणून कोण-कोण कशा प्रकारे याचना करत आहेत ?

37. 'धरण' कवितेतील स्त्रीच्या गरीबीचे वर्णन कसे केले आहे ?

38. उत्तम कांबळे कोणते दिवास्वप्न पाहत असत ?

39. आदर्श गुरुशिष्याची लक्षणे सांगा.

IV. खालील प्रश्नांची उत्तरे **आठ-दहा** वाक्यात लिहा : $5 \times 4 = 20$

40. चाफ्याच्या झाडाला गुलजार 'बडी माँ' का म्हणतात ? त्याची गंमत कोणती ?

41. 'सावित्रीबाई ख-या अर्थाने सहधर्मचारिणी होत्या' हे विधान स्पष्ट करा.

42. संत तुकडोजीना भारत कसा असावा असे वाटते ?

43. हिरव्या तृणपात्याचा सत्कार का व कसा केला ?

44. पुढील कविता पूर्ण करा -

सदाशिव हाकारतो .....................................

.............................................................

.............................................................

.............................................................

...................................... वाट राघुची पाहते.

## विभाग - B

## ( व्याकरणावर आधारित )

V. खालील पर्यायातून योग्य उत्तर निवडून लिहा : 10 × 1 = 10

45. 'सद्गुण ही संधी अशी सोडवतात'

(अ) सदा + गुण (ब) सद् + गुण

(क) सत् + गुण (ड) सदः + गुण.

46. 'आई घरी काम करते' या वाक्यात 'घर' याला या विभक्तीचा प्रत्यय लागला आहे

(अ) चतुर्थी (ब) पंचमी

(क) सप्तमी (ड) प्रथमा.

47. 'गाईने चारा खाल्ला' हे या प्रयोगाचे उदाहरण आहे

(अ) कर्तरी (ब) कर्मणी

(क) भावे (ड) या पैकी नाही.

48. 'रिया गाणे गात आहे.' या वाक्याचा काळ हा आहे

(अ) रीती वर्तमान काळ (ब) चालू वर्तमान काळ

(क) पूर्ण वर्तमान काळ (ड) भूत काळ.

49. शेळी जाते जिवानिशी आणि खाणारा म्हणतो ........... ही म्हण पूर्ण होण्यासाठी हा शब्द योग्य आहे.

(अ) गोड (ब) आंबट

(क) वातड (ड) स्वादिष्ट.

50. 'क्षणाक्षणाला' हा या समासाचा प्रकार आहे

(अ) अव्ययीभाव समास (ब) तत्पुरुष समास

(क) द्वंद्व समास (ड) द्विगू समास.

51. 'देशासाठी लढता, लढता येणारे मरण' याला एक शब्द हा

(अ) खून (ब) अपघाती मरण

(क) वीरमरण (ड) आत्महत्या.

52. हळुहळू सूर्य मावळत होता. यातील हळुहळू या शब्दाची जात ही आहे

(अ) नाम (ब) क्रियापद

(क) शब्दयोगी अव्यय (ड) क्रिया विशेषण.

53. 'तूप' हा शब्द या भाषेतून आला आहे

(अ) संस्कृत (ब) कन्नड

(क) हिंदी (ड) पोर्तुगीज.

54. विसर्गासाठी हे विरामचिह्न वापरतात

(अ) . (ब) :

(क) .......... (ड) ?

VI. खालील दोन शब्दातील संबंध ओळखून तिस-या पदाशी जुळणारा शब्द लिहा : 4 × 1 = 4

55. तुझे नाव काय ? : प्रश्नार्थी वाक्य : : मुलांनो अभ्यास करा :

56. सूर्य : रवी : : सुधांशु :

57. ग्रंथ : पुल्लिंगी : : पोथी :

58. सूर्योदय : सूर्यास्त : : अमृत :

VII. सूचनेप्रमाणे खालील प्रश्नांची उत्तरे लिहा : 3 × 2 = 6

59. 'डोक्यात विचाराची करवत गर्रकन फिरली'

अलंकार ओळखून लक्षण सांगा.

60. तशीच निज कोटरा परत पातली ते क्षणी गण पाडून वृत ओळखा.

61. पुढील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा :

i) पाणउतारा करणे —

ii) पंचत्वात विलिन होणे —

## विभाग - C
## ( लेखन विभाग रचनेवर आधारित )

VIII. 62. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर कल्पनेचा विस्तार करा. $1 \times 3 = 3$

(i) टाकीचे घाव सोसल्या शिवाय अंगी देवपण येत नाही.

(ii) करावे तसे भरावे.

IX. 63. तुम्ही केलेल्या सहलीचे वर्णन आईला / वडिलाना पत्राने कळवा. 5

**किंवा**

शाळा सोडलेल्या मित्राला / मैत्रिणीला शिक्षणाचे महत्व पटवून देणारे पत्र लिहा.

X. 64. खालीलपैकी एका विषयावर **15** ते **20** ओळीत निबंध लिहा : $1 \times 5 = 5$

(i) देश हा देव असे माझा

(ii) पर्यावरण रक्षण-काळाची गरज

(iii) आमचे राष्ट्रीय सण.